(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**भवानीपूर बँकिंग कॉर्पोरेशन लिमिटेड**

**विरुद्ध**

**गौरी शंकर शर्मा**

[मुख्यन्यायाधीश श्री हरिलाल कानिया, न्या. सैय्यद फजल अली, न्या. पतंजली शास्त्री, न्या. मेहरचंद महाजन, न्या. मुखर्जी आणि न्या. एस. आर. दास.]

मुदत अधिनियम (१९०८- IX), कलम १८२, खंड 2 आणि 3- हुकुमनाम्याची अंमलबजावणी- मुदत - प्रारंभ बिंदू- "जेथे पुनर्विलोकन झाले आहे", अर्थ - हुकुमनाम्याची सुनावणी पुन्हा सुरु करण्यासाठी बंगाल मनी-लेंडर्स कायदाच्या कलम ३६ अन्वये अर्ज- अनुपस्थितीसाठी फेटाळला गेला आणि सदर आदेशाविरुद्ध चे अपीलही फेटाळण्यात आले – हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता नवीन सुनावणीची सुरुवात होईल का? - कलम १८२, खंड २ आणि ३ चे विश्लेषन .

गहाणखताबाबतचा प्राथमिक हुकुमनामा 21 ऑगस्ट 1940 रोजी एकतर्फी मंजूर करण्यात आला. ऋणकोने, बंगाल मनी-लेंडर्स कायदा, कलम ३६ अन्वये हुकुमनाम्याची सुनावणी पुन्हा सुरु करण्यासाठी अर्ज केला आणि सदरील अर्ज 20 डिसेंबर १९४१ रोजी हजर न राहण्याच्या कसुरीबद्दल फेटाळण्यात आला आणि दिवाणी प्रक्रिया संहिता ,आदेश -९ , नियम ९ अन्वये केलेला पुनर्स्थापित करण्याचा अर्ज देखील 1 जून १९४२ रोजी फेटाळण्यात आला. दरम्यान, 22 डिसेंबर, १९४१ रोजी अंतिम हुकुमनामा पारित करण्यात आला. ऋणकोने त्याचा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-९, नियम ९ अन्वये केलेला पुनर्स्थापित करण्याचा अर्ज फेटाळणाऱ्या आदेशाविरुद्ध

अपील केले, सदरचे अपील न चालवल्याबद्दल हे अपील 3 जुलै 1944 रोजी फेटाळण्यात आले. ९ एप्रिल १९४५ रोजी धनकोने हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज केलाः

असे निर्णयीत करण्यात आले की, "पुनर्विलोकन" हा शब्द भारतीय मुदत कायदा, १९०८ च्या कलम १८२ मध्ये व्यापक अर्थाने वापरला गेला आहे आणि बंगाल मनी लेंडर्स कायदाच्या कलम ३६ अन्वये केलेला अर्ज हा पुनर्विलोकन अर्ज होता असे गृहीत धरले तरी, कलम १८२ चा खंड ३ या प्रकरणाला लागू होत नाही. कलम ३६ अन्वये केलेला अर्ज हा अनुपस्थितीमुळे फेटाळला गेला असल्यामुळे हुकुमनाम्याची सुनावणी पुन्हा सुरु होवू शकते की नाही सदर प्रश्नावर न्यायालयाला विचार करण्याचा प्रसंग आला नाही, आणि त्यामुळे उक्त खंडाच्या अर्थानुसार हुकुमनाम्याचे "पुनर्विलोकन करण्यात आले आहे" असे म्हटले जाऊ शकत नाही.

असेही निर्णयीत करण्यात आले की, "जेथे अपील केले गेले आहे" हे शब्द कलम १८२ च्या खंड २ मधील “हुकूमनामा अथवा आदेशाचा अंमलबजावणी करिता” ह्या शब्दांसह वाचले पाहिजे अगदी अनुच्छेदाच्या पहिल्या स्तंभामध्ये नमूद केल्याप्रमाणे, आणि बंगाल मनी लेंडर्स अॅक्ट चे कलम ३६ शी संबंधित अर्ज, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश-९, नियम ९ अन्वये केलेले पुनर्स्थापित करण्याचा अर्ज फेटाळणारे  आदेशातुन उद्भवलेले अपील केले होते ही वस्तुस्तिथी आहे. मुदतीसाठी कलम १८२, खंड २ नुसार, नवीन प्रारंभ बिंदू होऊ शकत नाही.

कलकत्ता उच्च न्यायालयाकडे उद्भवलेले अपील: दिवाणी अपील क्र. LI (५१)/१९४९.

मनोहर लाल, (एच. के. मित्तर त्यांच्यासोबत), अपीलकर्त्याच्या वतीने.

बी. सी. मित्तर, उत्तरवादीच्या वतीने.

१४ मार्च, १९५० रोजी न्यायालयाचा न्यायनिर्णय पारीत.

न्या. फझल अली- या अपीलात निर्णय घेण्याजोगा एकमेव प्रश्न, जो अंमलबजावणीच्या कार्यवाहीतून उद्भवतो, तो म्हणजे अंमलबजावणीखालील हुकुमनामा मुदतीद्वारे प्रतिबंधित आहे की नाही. पहिल्या न्यायालयाने असे म्हटले की हुकुमनामा प्रतिबंधित नाही, परंतु उच्च न्यायालय उलट निष्कर्षावर पोहोचले आहे आणि हुकुमनामाधारकाने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ११० अंतर्गत प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर या न्यायालयात अपील केले आहे.

वस्तुस्थिती खालीलप्रमाणे थोडक्यात सांगितली जाऊ शकते. ह्यातील अपिलार्थी ने दाखल केलेल्या दाव्यामध्ये गहाणखताच्या अंमलबजावणीसाठी एकतर्फी प्राथमिक गहाणखत हुकुमनामा २१ ऑगस्ट, १९४० रोजी पारित करण्यात आला. १९ सप्टेंबर १९४० रोजी, ऋणकोने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ९, नियम १३ अंतर्गत एकतर्फी हुकुमनामा रद्दबातल करणेचा अर्ज केला, परंतु हा अर्ज ७ जून १९४१ रोजी फेटाळण्यात आला. ११ जुलै, १९४१ रोजी ऋणको ने बंगाल मनीलेंडर्स कायद्याच्या कलम ३६ अंतर्गत प्राथमिक हुकुमनाम्याची सुनावणी पुन्हा सुरु करण्यासाठी अर्ज केला, परंतु सदर अर्ज हा २० डिसेंबर, १९४१ रोजी हजर न राहिल्याबद्दल फेटाळण्यात आले. त्यानंतर, २२ डिसेंबर रोजी अपीलकर्त्याच्या बाजूने अंतिम गहाणखत हुकुमनामा पारित करण्यात आला. त्यानंतर ऋणकोने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ९, नियम ९ अंतर्गत बंगाल मनीलेंडर्स कायद्याच्या कलम ३६ अर्जाचे कार्यवाही पुनर्संचयित करण्यासाठी अर्ज केला. तथापि, अर्जदार हजर न राहण्याचे पुरेसे कारण दर्शविले गेले नाही आणि कार्यवाही करण्यात तो अपयशी ठरला या दोन्ही कारणांमुळे आणि अंतिम हुकुमनामा पारित झाल्यानंतर प्राथमिक हुकुमनाम्याची सुनावणी पुन्हा सुरु केल्याने  कोणताही हेतू साध्य होणार नाही या कारणास्तव, १ जून, १९४२ रोजी अर्ज फेटाळण्यात आला. त्यानंतर ऋणकोने आदेश ९, नियम ९ अंतर्गत त्याचा अर्ज फेटाळण्याच्या आदेशाविरुध्द कलकत्ता येथील उच्च न्यायालयात अपील केले, परंतु ३ जुलै, १९४४ रोजी खटला न चालवल्याबद्दल अपील फेटाळण्यात आले. ९ एप्रिल, १९४५ रोजी अपीलकर्त्याने मूळ ऋणकोच्या विरोधात हुकुमनामा अंमलात आणण्यासाठी अर्ज

दाखल केला, जरी तो आधी मरण पावला असला तरी, हा अर्ज ११ मे, १९४५ रोजी गैरहजेरीमुळे फेटाळण्यात आला. २ जून, १९४५ रोजी अंमलबजावणीसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला होता आणि हा अर्ज मुदतीत केला की नाही, हा प्रश्न आपल्याला ठरवायचा आहे.

हे अगदी स्पष्ट आहे की, अंतिम हुकुमनाम्याच्या तारखेपासून तीन वर्षांहून अधिक काळानंतर अंमलबजावणीसाठी केलेला अर्ज हा मुदतबाह्य समजणेत यावा, परंतु, त्याउलट,आमच्यासमोर कथन केल्याप्रमाणे हे प्रकरण भारतीय मुदत कायद्याच्या कलम १८२ च्या अनुच्छेद २ किंवा अनुच्छेद ३ अंतर्गत येते. या अनुच्छेदाखाली, अर्ज करण्याची मुदत सुरु होते ती अशी आहे :

"2. (जेथे अपील केले गेले असेल) अपील न्यायालयाच्या अंतिम हुकुमनामा किंवा आदेशाची तारीख, किंवा अपील मागे घेतलेल्या तारखेपासून, किंवा

3. (जेथे निर्णयाचे पुनर्विलोकन झाले असेल) पुनर्विलोकनाचा निर्णय झालेल्या तारखेपासून."

असा युक्तिवाद करण्यात आला की हे प्रकरण अनुच्छेद ३ च्या कक्षेत येते आणि या युक्तिवादाच्या समर्थनार्थ, असे म्हणणे मांडले आहे की ऋणकोने बंगाल मनीलेंडर्स कायद्याच्या कलम ३६ अंतर्गत प्राथमिक गहाणखत ठेवण्याचा, हुकुमनाम्याची पुन्हा सुनावणी सुरु करण्यासाठी केलेला अर्ज पुनर्विलोकन अर्ज मानला पाहिजे आणि त्या अर्जाशी संबंधित कार्यवाहीत पारित केलेल्या अंतिम आदेशाच्या तारखेपासून तो चालवण्यासाठी मुदत चालू होते असे समजले पाहिजे. आमच्या मते, या युक्तिवादामध्ये काहीही तथ्य नाही. कलम १८२ च्या अनुच्छेद ३ मधील महत्त्वाचे शब्द असे आहेतः (1) “जेथे पुनर्विलोकन झाले आहे” आणि (2) “पुनर्विलोकनावर  निर्णय घेण्यात आला आहे”, हे शब्द दर्शवतात की कलम १८२, अनुच्छेद ३ च्या परिकक्षेत येण्याकरिता, प्रथम हे दर्शविले जाणे आवश्यक आहे की न्यायालयाने संबंधित

हुकूमनामा किंवा आदेशाचे पुनर्विलोकन करणेचे काम हाती घेतले होते आणि दुसरे म्हणजे, पुनर्विलोकनावर निर्णय घेण्यात आला आहे. सध्याच्या प्रकरणात, अनुच्छेद १८२ मध्ये "पुनरावलोकन" हा शब्द व्यापक अर्थाने वापरला गेला आहे आणि बंगाल मनीलेंडर्स कायद्याच्या कलम ३६ अंतर्गत हुकुमनाम्याची सुनावणी पुन्हा सुरु करण्यासाठी केलेला अर्ज हा पुनर्विलोकनासाठी केलेला अर्ज होता असे जरी गृहित धरले गेले असले, तरी अपीलकर्ता यशस्वी होऊ शकत नाही, कारण न्यायालयाने कधीही संबंधित हुकुमनाम्याचा आढावा घेण्याचे काम हाती घेतले नाही किंवा त्यात बदल करण्याचा हेतू दर्शविला नाही. प्रत्यक्षात जे घडले ते असे होते की, प्राथमिक हुकुमनाम्याची सुनावणी पुन्हा सुरु करण्यासाठी कलम ३६ अंतर्गत केलेला अर्ज (अंतीम हुकूमनामा नाही जो हुकूमनामा अंमलात आणायचा आहे) अनुपस्थितीच्या कारणास्तव फेटाळण्यात आला आणि दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ९, नियम ९ अंतर्गत बंगाल मनीलेंडर्स कायद्याच्या कलम ३६ अंतर्गत, कार्यवाही पुनर्संचयित करण्यासाठी केलेला अर्जही फेटाळण्यात आला. जरी कलम ३६ अंतर्गत ऋणकोच्या अर्जाकडे प्राथमिक हुकुमनाम्याच्या विरोधात निर्देशित केले गेले होते या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले गेले असले, तरी तो अर्ज गैरहजेरीसाठी फेटाळला गेला असल्याने, हुकुमनाम्याची सुनावणी पुन्हा सुरु केली जाऊ शकते की नाही या प्रश्नावर आपले मत व्यक्त करणेची न्यायालयाला कधीही संधी मिळाली नाही आणि म्हणूनच, सदर हुकुमनाम्याचे “पुनर्विलोकन करणेत आले आहे” असे म्हणता येणार नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २, नियम ९ अंतर्गत चे कामकाज देखील चर्चेसाठी याकामी उपयुक्त नाही, कारण त्यात अंमलात असलेल्या हुकुमनाम्याचे पुनर्विलोकन समाविष्ट नव्हते, परंतु जर तो आढावा घेणे शक्य आहे (जे आमच्या मते नाही), ते कलम ३६ अतर्गत ऋणकोचा अर्ज फेटाळणाऱ्या आदेशाचे पुनर्विलोकन करणे असे होईल.

अपीलकर्त्याच्या विद्वान वकिलाने असेही सुचवले होते की हे प्रकरण कलम १८२ च्या कलम २ द्वारे समाविष्ट केले जाऊ शकते, या आधारावर की, जरी अंतिम हुकुमनाम्याविरुद्ध

कोणतेही अपील केले गेले नसले तरी, "जेथे अपील केले गेले आहे" हे शब्द या प्रकरणात दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ९, नियम ९ अंतर्गत अर्ज फेटाळण्याच्या हुकुमनाम्याविरुद्ध केलेले अपील समाविष्ट करण्यासाठी पुरेसे व्यापक आहेत, जे बंगाल मनीलेंडर्स कायद्याच्या कलम ३६ अंतर्गत कार्यवाहीच्या संयोगाने केले गेले आहे. हा युक्तिवाद देखील अतिशय दूरगामी आहे, कारण "जेथे अपील केले गेले आहे" हा वाक्यप्रयोग कलम १८२ च्या स्तंभ 1 मधील शब्दांसह वाचला गेला पाहिजे, म्हणजे, "कोणत्याही दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी", आणि कितीही व्यापकपणे आपण त्याचा अर्थ लावला तरी,त्याचा अर्थ दुय्यम कार्यवाहीत पारित केलेल्या किंवा ज्याचा अंमलबजावणी सुरू असलेल्या हुकूमनाम्याशी थेट किंवा तात्काळ संबंध नाही अशा आदेशामधील अपील समाविष्ट करण्यासाठी आहे असे मानले जाऊ शकत नाही.

आमच्या मते, या अपीलामध्ये काहीही तथ्य नाही आणि त्यामुळे आम्ही ते खर्चासह फेटाळतो.

अपिल फेटाळण्यात येते.

अपीलकर्त्याचा प्रतिनिधीः पी. के. चॅटर्जी

प्रतिवादीसाठी प्रतिनिधीः आर. आर. बिस्वास.

**<u>अस्वीकरण</u>**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x